पुणे शहर पोलीस

# दर्पण

ऑगस्ट २०१९

# अभिप्राय...

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

### दर्पण पुस्तीका अभिप्राय

१)पोलीस कर्मचारी यांचे संपुर्ण नाव : गणेश सुभाष खांडेकर

२)पदनाम : पोलिस शिपाई

३)बक्कल नंबर : 8814

४)नेमणुकीचे ठिकाण / पो स्टे : स्वारगेट पो.स्टे. पुणे

५)दर्पण पुस्तीकेबाबत आपला प्रतिक्रीयात्मक अभिप्राय/मत -

दर्पन या पुस्तकातील माहिती पोलिसांसाठी खूप छान लिहिलेली आहे, या पुस्तकात पोलीस खात्याबद्दलची माहिती वाचायला मिळते तसेच पोलिसांनी केलेली काम यांची माहिती दर्पण या पुस्तकातून अतिशय समर्पक रित्या सांगितलेली आहे.

तसेच या पुस्तकातील माहिती ही आमच्यासाठी तसेच आमच्या कामात तिचा चांगला उपयोग होत असून ती अतिशय महत्वाची आहे.

दिनांक 24/08/2019

स्वाक्षरी PC8814

---

प्रति,
मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर

प्रतिवेदक :- एम. बी. [illegible] म.पो. उप.निरीक्षक.
विश्रांतवाडी पो.स्टे. पुणे शहर.

विषय :- दर्पण पुस्तकाचे अभिप्राय बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस सादर करते की मा. पोलीस आयुक्त पुणे शहर. यांनी त्यांचे संकल्पनेतून साकार करण्यात आलेली 'दर्पण' पुस्तीकेचे आम्ही [illegible] वाचन करीत आहोत. त्यामुळे आम्हाला पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाविषयी बाबत माहिती मिळून त्याप्रमाणे कार्य करण्यात आम्हाला प्रोत्साहन मिळत आहे.

आम्ही रिसेप्शन हाऊस येथे पोलीस ठाण्याकडील "दर्पण" पुस्तीका ही ठेवून आम्ही पो.स्टे येथे येणाऱ्या अर्जदार व नागरीकांनी वाचण्यास देवून सदर पुस्तकेमुळे नागरीकांच्या मनात पोलीसांबाबत चांगली प्रतिमा निर्माण होण्यास मदत होत आहे.

मा. सादर व्हावे

म. पोलीस उप.निरीक्षक
वि.वाडी पो.स्टे पुणे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) गुन्ह्यांना पायबंद | : | १ ते २४ |
| २) कारवाई | : | २५ ते ४० |
| ३) लोकाभिमुख उपक्रम | : | ४१ ते ६२ |
| ४) पोलिसांमधील माणूस | : | ६३ ते ७० |
| ५) समुपदेशन व सामाजिक बांधीलकी | : | ७१ ते ७६ |
| ६) वाहतुक सुलभता | : | ७७ ते ८४ |
| ७) उत्कृष्ट कार्य | : | ८५ ते ९२ |
| ८) उत्कृष्ट तपास | : | ९३ ते १२२ |

# गुन्ह्यांना पायबंद

The Indian EXPRESS - 10 August, 2019

# Crime branch cops bust gang operating on PMPML buses

## The hooligans targeted senior citizens, women, snatching valuables in crowded vehicles at places like Swargate, Shivajinagar

Pune Mirror Bureau
punemirror.feedback@gmail.com
TWEETS @ThePuneMirror

Pune crime branch has busted a gang that has been committing thefts in crowded Pune Mahanagar Parivahan Mahamandal Ltd (PMPML). The gang has been on a prowl and targeting senior citizens and women and snatching valuables from them on moving buses. While crime branch (unit 2) arrested five accused, 14 cases have been detected. The police team travelled in one of the routes the gang operated in after getting a tip-off and arrested the miscreants.

Krishana alias Anna Popatrao Gavhane (24, Wagholi), Akash alias Akkaya Shivaji Ahivale (20, Dhankwadi), Mangesh alias Mangya Suresh Ukrande (18, Wagholi), Suraj Kishor Sonwane (21, Khardai) and Hukumsingh Rajsingh Bhatti (47) have been the ones held by the crime branch cops.




Two teams of crime branch arrested five gang members on a moving bus

Gajanan Pawar, police inspector, crime branch (unit 2), received information about the gang. As per sources, the accused would take a PMPML bus near Pune railway station with the purpose of carrying out the crimes. Two teams of the crime branch trapped the gang on one of the PMPML buses. When police interrogated the accused, they allegedly said that crowded areas like Pune station, Swargate, Shivajinagar were their zones of operation. Taking advantage of crowded buses, they would target senior citizen and women and steal gold, silver jewellery and cash. 14 cases have been detected by the crime branch and gold ornaments worth Rs 4 lakh and cash worth Rs 30,000 have been recovered.

TIMES OF INDIA Date 28 August, 2019

# Four criminals arrested for burglaries, 50 cases solved

## Booty Worth ₹81 Lakh Seized

**Pune:** The Wanowrie police on Tuesday claimed to have solved 50 burglary cases following the recent arrest of four criminals on records.

Six four-wheelers, a motorcycle, one kg of gold and 10kg of silver ornaments — collectively worth Rs81 lakh — were recovered from their possession. The burglars had initially started with stealing four-wheelers from different parts of the city. All the four suspects are residents of Ramtekdi in Hadapsar.

The suspects were identified as Gorakhsingh Gangasingh Tak (30), Ujala Prabhusingh Tak (27), Ballusingh Prabhusingh Tak (30) and Jalsingh Rajput Dudhani (26). All four have been arrested for robbery and theft cases. They were out on bail. "Ballusingh Tak is the ring leader," joint police commissioner Ravindra Shisve said.

The Wanowrie police were checking footage from surveillance cameras during the investigation of a theft case on August 11. A police team then realized that the suspects captured in the footage were criminals on police record. The team comprised assistant commissioner

### STOLEN PISTOL RECOVERED

Ravindra Shisve said.

The Wanowrie police were checking footage from surveillance cameras during the investigation of a theft case on August 11. A police team then realized that the suspects captured in the footage were criminals on police record. The team comprised assistant commissioner

and Dudhani were apprehended from their hiding spot in Dhule district," Shisve said.

Patil said the suspects stole the vehicles from Bhosari, Wakad and Nigdi. They would drive around the city in four-wheelers and look for locked flats in housing societies. They broke the flats' locks to with a long iron rod. They had targeted flats in areas including Kothrud, Hadapsar, Wanowrie, Dattawadi, Koregaon Park and Bharati Vidyapeeth.

The suspects had also stolen a foreign-make pistol and six bullets from a flat in Kothrud. The police have recovered the weapon and live cartridges. "The weapon was not misused," Shisve said.

The police have also arrested jewellery shop owner Satyanarayan Varma of Urali Kanchan for purchasing the stolen gold and silver ornaments from the suspects.

# हॉटेल व्यवसायिकाला खंडणी मागणारे जेरबंद

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – माथाडी कामगार संघटनेच्या नावाखाली हॉटेल व्यावसायिकाला धमकावून खंडणी मागणाऱ्या चौघांना गुन्हे शाखेने जेरबंद केले. मागील दीड महिन्यापासून व्यावसायिकाला धमकावून दरमहिन्याला १८ हजारांच्या हप्त्याची मागणी केली जात होती.

ओम तीर्थराम धर्मजिज्ञासू (वय ३०, रा. शास्त्रीनगर, कोथरूड), ललित मारुती काकडे (वय २८, रा. वारजे-माळवाडी), महेश कालिदास परीट (वय १९, रा. जय भवानीनगर, कोथरूड), योगेश प्रकाश कानगुडे (वय २४, रा. कोथरूड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांच्या ताब्यातून ५१ हजार रुपये किमतीचे चार मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

ओम हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध कोथरूड पोलीस ठाण्याअंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल आहे. तसेच तो गज्या मारणे टोळीशी निगडित असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी हॉटेल व्यावसायिक कुमार राजेंद्र झेंडे (वय २७, रा. फुरसुंगी) यांनी अलंकार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. कुमार झेंडे यांचे कर्वे रस्ता परिसरात हॉटेल आहे. दोन महिन्यांपूर्वी योगेश कानगुडे याने झेंडे यांना माथाडी कामगार संघटनेमध्ये कार्यरत असल्याचे सांगत व्हिजिटिंग कार्ड दिले. तसेच 'तुम्ही हॉटेलमध्ये साहित्य भरताना आणि उतरविताना संघटनेच्या हमालांना बोलवीत नाही,' असे सांगत पैशांची मागणी केली. त्यावेळी झेंडे यांनी योगेशला गडबडीत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर पाच दिवसांनी योगेशने हॉटेलमध्ये येऊन पुन्हा पैशांची मागणी केली असता, झेंडे यांनी नकार दिला. त्यावेळी योगेशने ओमला फोन लावून दिला. त्यानेही पैशांची मागणी केली. त्यानंतर चार आरोपींनी झेंडे यांना सातत्याने फोन करून पैशांची मागणी केली. 'तुझ्या हॉटेलमध्ये जो माल येतो, तो आमच्या माथाडी कामगारांकडूनच खाली करून घ्यायचा; अन्यथा त्याबदल्यात आम्हाला प्रत्येक महिन्याला १८ हजारांचा हप्ता द्यायचा. तू हॉटेल कसे चालवितो हेच आम्ही पाहतो,' अशी धमकी दिली. हे चौघे आरोपी सुतारदरा परिसरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड व राजकुमार केंद्रे यांच्या पथकाने सापळा रचून त्यांना पकडले.

ही कामगिरी गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, अनिल शिंदे, रामदास गोणते, संदीप तळेकर, दत्तात्रय गरुड, संदीप राठोड, प्रवीण तापकीर यांच्या पथकाने केली.

सामना – दि. ११ ऑगस्ट, २०१९

# वानवडीत जुगारअड्ड्यावर छापा; १४ जणांना अटक

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – वानवडीतील शेलार वस्तीत सुरू असलेल्या जुगारअड्ड्यावर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने छापा टाकून ३४ हजारांचा ऐवज जप्त केला. तर, १४ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार ॲक्टनुसार वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

सामाजिक सुरक्षा विभागातील कर्मचारी शशांक यांना शेलार वस्ती, शांतीनगरमध्ये जुगारअड्डा सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने सापळा रचून तेथे छापा टाकून ३४ हजारांचा ऐवज जप्त केला, तर जुगार खेळणाऱ्या १४ जणांना अटक करण्यात आली असून, एक जण फरार झाला. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक भागवत मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक खडके, पोलीस हवालदार क्षीरसागर, चव्हाण, पठाण, खाडे यांच्या पथकाने केली.

### येरवड्यातील सराईत तडीपार

येरवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका सराईताला पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून एक वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे. अमित रविकिरण गायकवाड (वय २९,रा. येरवडा) असे त्याचे नाव आहे. परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त प्रसाद अक्कानवरू यांनी आदेश दिले आहेत. गायकवाडविरुद्ध येरवडा पोलीस ठाण्यांतर्गत खुनाचा प्रयत्न, घातक शस्त्राने दुखापत करणे यांसह विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत; त्याच्यामुळे सार्वजनिक शांततेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने त्याला तडीपार करण्यात आले आहे.

# दानपेट्या चोरणारे तिघे सराईत जेरबंद

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) – मंदिरातील दानपेट्यांवर डल्ला मारणाऱ्या तिघा सराईतांना खडक पोलिसांनी जेरबंद केले. त्यांच्या ताब्यातून दोन दानपेट्यांसह २२ हजार ५३८ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. मौजमजेसाठी त्यांनी चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे. बाजीराव रस्त्यावरील नातूबाग गणपती मंदिरासह शहरातील दोन मंदिरांमधील दानपेट्यांची चोरी केल्याची कबुली त्यांनी दिली आहे.

शाहरुख सलाउद्दीन खतीब (रा. काशेवाडी, भवानी पेठ), रमिज इक्बाल हकिम खान (रा. घोरपडी पेठ) आणि बिल्लाल गफूर शेख (रा. भवानी पेठ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

गणेश पेठेतील साईबाबा मंदिर, घोरपडे पेठेतील नवग्रह मारुती मंदिर, बाजीराव रस्त्यावरील नातूबाग गणपती मंदिरातील दानपेट्या चोरीस गेल्या होत्या. सहायक पोलीस निरीक्षक उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी आशिष चव्हाण, दीपक मोधे, महावीर दानवे यांनी चोरट्यांना अटक केली. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त श्रीकांत तरवडे, पोलीस उपायुक्त स्वप्ना गोरे, सहायक पोलीस आयुक्त प्रदीप आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भरत जाधव, पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे, सहायक पोलीस निरीक्षक उमाजी राठोड व पोलीस कर्मचारी विनोद जाधव, गणेश सातपुते, संदीप पाटील, आशिष चव्हाण, महावीर दावणे, दीपक मोधे, इम्रान नदाफ, राकेश क्षीरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर यांच्या पथकाने केली.

# तडीपार सराईताकडून काडतुसासह पिस्तूल जप्त

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) – शहरासह जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेल्या एका सराईताला पोलिसांनी जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून देशी बनावटीचे पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. संतोष विनायक नातू (वय ४३) असे अटक केलेल्याचे नाव आहे. त्याला मार्केट पोलीस ठाण्याच्या हद्दीत पकडण्यात आले.



मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

मार्केटयार्ड परिसरातील 'वास्तुश्री' कॉम्प्लेक्समध्ये 'रॉयल थाय स्पा' मसाज सेंटरमध्ये परराज्यांतील मुलींकडून वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून चार मुलींची सुटका करण्यात आली आहे.

राहुल झांबरे आणि पूनम राम कालेकर अशी ताब्यात घेण्यात आलेल्यांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्केटयार्ड परिसरातील 'वास्तुश्री' इमारतीत मसाज सेंटरमध्ये परराज्यांतील मुलींकडून वेश्याव्यवसाय करवून घेत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सामाजिक सुरक्षा पथकाने तेथे छापा टाकून चार मुलींची सुटका केली. मसाज सेंटरमालक आणि व्यवस्थापक राहुल झांबरे आणि पूनम कालेकर यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# ध्वनिप्रदूषण केलेल्या पाच मंडळांवर गुन्हे

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

दहीहंडी उत्सवात ध्वनी मर्यादेचे उल्लंघन केल्याप्रकरणी वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांत ध्वनिप्रदूषण कायद्यानुसार पाच गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. फरासखाना पोलिस ठाण्यात चार दहीहंडी मंडळांवर नियमभंगाप्रकरणी खटले भरण्यात आले आहेत, अशी माहिती विशेष शाखेचे उपायुक्त मितेश घट्टे यांनी दिली.

शहरात लहान-मोठ्या ९८३ मंडळांनी दहीहंडी उत्सव साजरा केला. त्यापैकी ७३ मंडळे गर्दी असणारी होती. या मंडळांना नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच, रात्री दहापर्यंत स्पीकर बंद करण्याचे सूचित करण्यात आले होते. मात्र, शहरात काही मंडळांनी ध्वनिप्रदूषण कायद्याचे उल्लंघन केल्याचे आढळून आले. अशा पाच मंडळांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी फरासखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेले रविवार पेठेतील लाल बहादूर शास्त्री तरुण मंडळ, शिवशक्ती तरुण मंडळ, मिर्झा गालिब चौक या दोन मंडळांवर पर्यावरण संरक्षण अधिनियमन, ध्वनिप्रदूषण नियंत्रण कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. यातील शिवशक्ती मंडळ खडक पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्यामुळे त्यांचा अहवाल खडक पोलिसांकडे पाठविण्यात आला आहे. तसेच, फरासखाना पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राधाकृष्ण ग्रुप कसबा पेठ, वैभव मित्र मंडळ, बुधवार पेठ, धक्क्या मारुती मित्र मंडळ, बुधवार पेठ, युवा आघाडी शुक्रवार पेठ या दहीहंडी मंडळांनी आवाजाची पातळी ओलांडल्यामुळे त्यांच्यावर महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ नुसार खटले दाखल केले आहेत, अशी माहिती फरासखाना पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक किशोर नावंदे यांनी दिली.

यावरोबरच कोथरूडच्या मोरे विद्यालय चौकातील शिवशाही फ्रेंड सर्कल या मंडळाने दहीहंडी उत्सवात ध्वनिमर्यादेचे उल्लंघन केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. कोरेगाव पार्क येथील अखिल कोरेगाव पार्क दहीहंडी मंडळावर ध्वनिप्रदूषणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या मंडळाचे अध्यक्ष सोनू परदेशी यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. या ठिकाणची साउंड सिस्टीम पोलिसांनी जप्त केली आहे. तसेच, येरवडा परिसरातील एका मंडळावरही या कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे.

**सामना** – दि. ०८ ऑगस्ट, २०१९

# दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेली टोळी जेरबंद

पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) - कपड्याच्या गोदामात दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांच्या टोळीला हडपसर पोलिसांनी अटक केली. ही कारवाई काल पहाटे पाचच्या सुमारास फुरसुंगी परिसरातील मंतरवाडी फाटा येथे करण्यात आली. त्यांच्या ताब्यातून कोयते, कटावणी, मिरची पूड, नायलॉनची दोरी असा ऐवज जप्त करण्यात आला.

प्रमोद सुभाष शिंदे (वय २७, रा. हडपसर), शेखर सुरेश गायकवाड (वय ३५, रा. देवाची उरळी), शोएब मजीद शेख (वय १९, रा. भेकराईनगर), देवीदास घनश्याम पवने (वय २१, रा. काळेपडळ), निखिल रवींद्र वाघमारे (वय १९, रा. मांजरी) अशी अटक केलेल्यांची नावे असून, त्यांचा अन्य एक साथीदार फरार आहे. याप्रकरणी पोलीस नाईक प्रकाश गायकवाड यांनी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. यातील शोएब आणि प्रमोद हे सराईत गुन्हेगार आहेत.

या टोळीबाबत माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने तेथे जाऊन प्रमोद, शेखर, शोएब, देवीदास, निखिलला अटक केली. ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, कर्मचारी अकबर शेख, प्रताप गायकवाड, अमित कांबळे, शाहिद शेख, नवले, विनोद शिवले यांच्या पथकाने केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २१ ऑगस्ट, २०१९

# जुगार अड्ड्यावर पोलिसांकडून छापा

## सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त; १४ जण ताब्यात



म. टा. वृत्तसेवा, दौंड

शहरातील वातानुकूलित जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टकून २ लाख १२ हजार ७३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, १४ जणांना ताव्यात घेतले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. बारामतीचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयंत मीना यांच्या उपस्थितीत ही कारवाई झाली.

शहरातील इंदिरानगरमध्ये एका बंद खोलीत इक्बाल शेख जुगाराचा अड्डा चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयंत मीना यांच्या पथकाने बारामती गुन्हे शोध पथकासह छापा टाकला. या छाप्यात रोख रक्कम १ लाख १६ हजार ७३० रुपये, ७० हजार रुपये किमतीचे १० मोबाइल, एसी, इन्व्हर्टर असा एकुण २ लाख १२ हजार ७३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, १४ आरोपींना ताव्यात घेण्यात आले आहे. रात्री उशिरा त्यांच्यावर गुन्हा दाखल करून, नंतर जामिनावर सोडण्यात आले.

गुन्हे शोध पथकाचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, दौंड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील महाडिक, यवत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक धनंजय कापरे, सहायक फौजदार भाकरे, पोलिस नाईक स्वप्नील अहिवळे, हवालदार संदीप जाधव, सुरेंद्र वाघ, शिपाई दशरथ कोळेकर, विशाल जावळे, कॉन्स्टेबल सचिन बोराडे, महिला शिपाई रूपाली पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पुण्यनगरी – दि. ०८ ऑगस्ट, २०१९

# मंगळवारपेठेत सत्तूरची विक्री करणाऱ्या दोघांना अटक; १५ सत्तूर जप्त

**पुणे** : मंगळवार पेठेतील जुन्या बाजारात सत्तूर विक्री करणाऱ्या दोघांना फरासखाना पोलिसांनी अटक केली. त्यांच्या ताब्यातून चार हजारांचे १५ सत्तूर हस्तगत केले आहेत. शहरात होणाऱ्या जवळपास सर्वच गुन्ह्यांत सत्तूर आणि कोयत्यांचा सर्रास वापर होताना दिसत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. दिनेश सुखलाल साळुंके (वय ४२, रा. कसबा पेठ), राधाबाई शामराव पवार (वय ७०, रा. मंगळवार पेठ) यांना अटक केली आहे. त्यांच्याकडे शस्त्र विक्रीचा कोणताही परवाना नव्हता. त्यांच्यावर आर्म ॲक्ट अंतर्गत कारवाई केली आहे. शहरात घडणाऱ्या अनेक शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये कोयता आणि सत्तूरचा वापर होत आहे. खून, खुनाचा प्रयत्न, वाहनांची तोडफोड अशा प्रकरणात सत्तूर व कोयता वापरला जात आहे. अल्पवयीन मुलेही कोयता हातात घेऊन दहशत निर्माण करीत असल्याचे प्रकार घडले आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवार पेठेत सत्तूर विक्री केली जात आहे, अशी माहिती मिळताच फरासखाना पोलिसांनी कारवाई केली. सहायक पोलीस निरीक्षक अमित घुले, पोलीस उपनिरीक्षक संगीता गायकवाड, प्रतीक्षा शेंडगे, यशपाल सूर्यवंशी, पोलीस कर्मचारी बापूसाहेब खुटवड, अमर शिंदे, दिनेश भांदुर्गे, अमोल सरडे, मोहन दळवी, बजरंग बिचकुले, किरण धाईंजे यांच्या पथकाने कामगिरी केली.

सकाळ – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# हॉटेल, बारवर धडक कारवाई

## शोध मोहिमेमध्ये ५३ गुन्हेगारांना अटक



**पुणे, ता. १७ : गुन्हे शाखेने शनिवारी रात्री शहरात गुन्हेगारांचा शोध घेण्याची मोहीम राबविली. त्याअंतर्गत ५३ जणांना अटक केली. मोहिमेत रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या अकरा हॉटेल व बारवर कारवाई केली आहे.**

### मसाज सेंटरवर छापा

सामाजिक सुरक्षा विभागाने चंदननगर येथील खराडी बाह्यवळणाजवळच्या इमारतीमधील अरोमा पंचकर्म सेंटरवर छापा टाकला. तेथे मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू होता. सेंटर चालविणाऱ्या महिलेस दोघांना अटक करून चंदननगर ठाण्याच्या ताब्यात दिले.

गुन्हे शाखेचे अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे व पोलिस उपायुक्त बच्चन सिंग यांनी शहरातील गुन्हेगारी टोळ्या, रात्री उशिरापर्यंत सुरू असणारे हॉटेल, रेस्टॉरंट व बार, बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकांनी शनिवारी रात्री ही कारवाई केली.

गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने डेक्कन, शिवाजीनगर, फरासखाना ठाण्याच्या हद्दीतील १६ टोळी गुन्हेगारांची तपासणी केली. त्यापैकी सात जण मिळून आले. युनीट दोनच्या पथकाने दहा टोळी गुन्हेगार तपासले, त्यापैकी तीन मिळून आले. तसेच, सहकारनगर ठाण्याच्या हद्दीत संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. कोयता आढळल्याने त्यांना अटक केली. युनिट तीनच्या पथकाने कोथरूड ठाण्याच्या हद्दीतील दहा टोळी गुन्हेगार तपासले, त्यापैकी सात जण आढळले. युनिट चारच्या पथकाने १६ टोळी गुन्हेगारांची तपासणी केल्यानंतर त्यांना चार जण सापडले, तर युनिट पाचच्या पथकाने १६ जणांची तपासणी केली, त्यांना आठ गुन्हेगार आढळले. खंडणी व अमली पदार्थविरोधी पथकाच्या तपासणीमध्ये आठ गुन्हेगार आढळून आले.

युनिट चारच्या पथकाने हॉटेल बराझा, तर युनिट पाचच्या पथकाने बीएमजी, अनप्लिग पब्लिसिटी, एजंट जॅक बार, दी टिकी बार; तर खंडणीविरोधी पथकाच्या तपासणीमध्ये बुधवार पेठेतील शंकर पान शॉप, नागेश पान शॉप व अब्दुल पान शॉप हे रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे आढळले. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध खटले दाखल केले.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १८ ऑगस्ट, २०१९

# गुन्हे शाखेकडून गुंडांची झाडाझडती

- ११ खटले दाखल
- बार, हॉटेल्स आणि मसाज सेंटरवर छापेमारी

पुणे : प्रतिनिधी

शहरातील गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी गुन्हे शाखेच्या पथकांनी शनिवारी रात्री शहराच्या वेगवेगळ्या भागांमध्ये शोधमोहीम राबविली. या कारवाईत ८४ गुन्हेगारांची झडती घेण्यात आली, तसेच ४० हॉटेल्स आणि आस्थापनांवर छापे टाकून ११ जणांविरोधात खटले भरण्यात आले.

गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे आणि पोलीस उपायुक्त बच्चन सिंग यांनी शहरातील गुन्हेगारी टोळ्या, रात्री उशिरापर्यंत सुरू असणारी हॉटेल्स, रेस्टॉरंट, बार, तसेच बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली.

गुन्हे शाखेच्या युनिट-१च्या पथकाने डेक्कन, शिवाजीनगर, फरासखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील १६ टोळी गुन्हेगारांची तपासणी केली. त्यापैकी सात गुन्हेगार मिळून आले. युनिट-२च्या पथकाने १० टोळी गुन्हेगार तपासले. त्यापैकी तीन गुन्हेगार मिळून आले. तसेच सहकारनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कोयता आढळून आल्याने त्यांना अटक करण्यात आली. युनिट-३च्या पथकाने कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १० टोळी गुन्हेगार तपासले, त्यापैकी सातजण पोलिसांना आढळून आले. युनिट-४च्या पथकाने १६ टोळी गुन्हेगारांची तपासणी केल्यानंतर त्यांना चारजण सापडले, तर युनिट-५च्या पथकाने १६ जणांची तपासणी केली, त्यांना आठ गुन्हेगार आढळून आले. खंडणी व अमली पदार्थ विरोधी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये आठ गुन्हेगार आढळून आले.

कारवाईदरम्यान बराझा हॉटेल, तर युनिट पाचच्या पथकाने बीएमजी, अनपलग पब्लिसिटी, एजंट जॅक बार, द टिकी बार, तसेच बुधवार पेठेतील शंकर पान शॉप, नागेश पान शॉप व अब्दुल पान शॉप हे रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करून न्यायालयामध्ये खटले दाखल करण्यात आले.

## मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

सामाजिक सुरक्षा विभागाने चंदननगर येथील खराडी बाह्यवळणाजवळ असलेल्या एका इमारतीमध्ये सुरू असलेल्या अरोमा पंचकर्म सेंटरवर छापा घातला. तेथे मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू होता. सेंटर चालविणाऱ्या एका महिलेसह दोघांना अटक करून चंदननगर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पुढारी – दि. ०६ ऑगस्ट, २०१९

# कॉलेज कॅम्पस परिसरात मोबाईल चोरी करणाऱ्याला अटक

## ८३ हजारांचे सहा मोबाईल जप्त; मौजमजा करण्यासाठी करायचा चोऱ्या; आरोपी रेकॉर्डवरील सराईत चोर

**पुणे: प्रतिनिधी**

सिंहगड कॉलेजच्या कॅम्पस परिसरातील विद्यार्थ्यांच्या वसतिगृहातून मोबाईलची चोरी करणाऱ्या अमर वैजनाथ समुकराव (वय १९, रा. पांढरगाव, गंगाखेड, परभणी) याला भारती विद्यापीठ पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

त्याच्या ताब्यातून चोरीचे ८३ हजार रुपये किमतीचे सहा मोबाईल पोलिसांनी जप्त केले आहेत. आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत चोरटा असून, मौजमजा करण्यासाठी तो पाळत ठेवून मोबाईल चोरत असे. अगदी मिळेल त्या किमतीला तो मोबाईल विकून त्या पैशातून मौज करत असे. वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी उपनिरीक्षक महेंद्र पाटील हे गस्तीवर असताना कर्मचारी समीर बागसीराज व प्रणव सकपाळ यांना चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी एक जण भारती विद्यापीठ परिसरात थांबला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून अमरला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने आंबेगाव बुद्रुक परिसरातील सिंहगड कॉलेज कॅम्पस परिसरासह इतर ठिकाणांहून ८३ हजारांचे सहा मोबाईल चोरल्याची कबुली दिली.




नवीन चित्रपट पाहण्याचा अमरला छंद होता. त्यासाठी तो रात्री परभणीहून प्रवास करून सकाळी पुण्यात येत होता. त्यानंतर सिंहगड कॉलेजमधील वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोबाईल तो चोरी करत होता. सदरची कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक विष्णू पवार, गुन्हे निरीक्षक विष्णू ताम्हाणे, कर्मचारी विनोद भंडलकर, श्रीधर पाटील, गणेश सुतार, उज्ज्वल मोकाशी यांच्या पथकाने केली.

### बापाच्या कोठडीत वाढ

पुणे : पोटच्या दोन मुलींवर बलात्कार करून पत्नीच्या मदतीने दोन मुली, एक मुलाचा गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार भोसरी परिसरात गेल्या काही दिवसांपूर्वी घडला होता. याप्रकरणी भोसरी पोलिसांनी अटक केलेल्या नराधम बापाच्या पोलिस कोठडीत ९ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. मूळचे कर्नाटक येथील पाच जणांचे कुटुंब पुण्यात भोसरी परिसरात राहण्यास आले होते. २८ जुलै २०१९ रोजी दुपारी नऊ आणि सात वर्षांच्या दोन मुलींवर त्याने बलात्कार केला. त्यानंतर त्याने पत्नीच्या मदतीने दोन मुलींसह सहा वर्षांच्या मुलाचा गळा आवळून खून केला. त्यानंतर तिघांचेही मृतदेह नायलॉनच्या दोरीने छताला अडकविले. तिघांचा खून करून पिता बाहेर पडल्यानंतर पत्नीने आतून दाराची कडी लावून स्वत: आत्महत्या केली, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पोलिस कोठडीची मुदत संपल्याने पित्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने घटना घडल्यानंतर नातेवाईकांना फोन केला होता, त्याबाबत त्यांच्याकडे चौकशी करण्यासाठी, आरोपीच्या कर्नाटक येथील मूळ गावी जाऊन चौकशी करण्यासाठी आरोपीच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी अतिरिक्त सरकारी वकील प्रमोद बॉबटकर यांनी केली. ती न्यायालयाने मान्य केली.

**बलात्कारप्रकरणी एकाला अटक**

मेहुण्याच्या पत्नीवर बलात्कार करणाऱ्या एकाला मार्केट यार्ड पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने ८ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी २७ वर्षीय पीडित महिलेने फिर्याद दिली आहे. ६ एप्रिल २०१३ ते १२ फेब्रुवारी २०१८ दरम्यान ही घटना घडली आहे. अटक केल्याने पीडितेवर बळजबरीने अत्याचार केला असून, तिच्या सासऱ्यांनी घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास संसार उद्‌ध्वस्त करेन, अशी धमकी दिली आहे. त्याच्यावर तसेच महिलेचा पती, सासरे, सासू , नणंद यांच्यावर मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दत्तवाडीतील जुगार अड्ड्यावर छापा**

दत्तवाडी परिसरात सुरू असणाऱ्या जुगार अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या युनिट दोनच्या पथकाने छापा टाकून पर्दाफाश केला आहे. या ठिकाणावरून ११ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. रोकड व जुगाराचे साहित्य असा एकूण ६ हजार ४९० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. रविवारी मध्यरात्री पोलिसांनी १८ गुन्हेगारांची तपासणी केली असून, त्यात ८ गुन्हेगार मिळून आले आहेत. शहरातील ७४ हॉटेल्सची तपासणी केली आहे. त्यातील १२ हॉटेल्सवर खटले दाखल करण्यात आले आहेत.

**महिलेच्या कोठडीत वाढ**

उसने दिलेले पैसे मागितल्याच्या रागातून एकाचा खून केल्याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी अटक केलेल्या महिलेच्या पोलिस कोठडीत ७ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. वैशाली मारणे ऊर्फ वैशाली वीरेंद्र ऊर्फ सारीपुत्र गायकवाड (वय ४२) असे पोलिस कोठडीत वाढ करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणी यापूर्वी चार जणांना अटक करण्यात आली असून, एका अल्पवयीन मुलीला ताब्यात घेण्यात आले आहे. राजाराम गुलाब साळुंके (वय ५५) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत २४ वर्षीय तरुणाने फिर्याद दिली आहे. २ मे २०१९ रोजी मांजरी खुर्द गावाच्या हद्दीत ही घटना घडली. याप्रकरणी पोलिस कोठडीची मुदत संपल्याने वैशालीला पुन्हा न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्याच्या तपासासाठी तिच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सरकारी वकिलांनी केली.

लोकसत्ता – दि. १७ ऑगस्ट, २०१९

# टोळीयुद्धात सत्तूरचा वापर; शस्त्र विक्रेते अटकेत

## जुन्या बाजारातून १५ सत्तूर जप्त

प्रतिनिधी, पुणे

**टोळीयुद्ध तसेच** किरकोळ गुन्ह्यांत एकमेकांना धमकावणे तसेच मारण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सत्तूर या शस्त्राची विक्री करण्यास पोलिसांनी बंदी घातलेली असताना जुना बाजार परिसरात सत्तूर विक्री करणाऱ्या दोघांना फरासखाना पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून १५ सत्तूर जप्त करण्यात आले.

या प्रकरणी दिनेश सुखलाल साळुंके (वय ४२, रा. कसबा पेठ) याच्यासह एका महिलेला अटक करण्यात आली. गुन्हेगारी कृत्यात सत्तूर आणि कोयत्याचा वापर करण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. यापार्श्वभूमीवर पोलिसांनी बेकायदा सत्तूर विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली होती. गेल्या वर्षी जुन्या बाजार परिसरातून मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा जप्त करण्यात आला होता. सत्तूर विक्री प्रकरणी या परिसरातून तीक्ष्ण शस्त्र तयार करणाऱ्यांना अटक केली होती. त्यानंतर जुना बाजार परिसरात शस्त्र विक्रेत्यांना बसण्यास मनाई करण्यात आली होती. फक्त लोखंडी अवजारे तसेच स्वयंपाकासाठी लागणाऱ्या सुरी विकण्याची परवानगी देण्यात आली होती.

साळुंके आणि एका महिलेने जुना बाजार परिसरात पुन्हा सत्तूर विक्री सुरू केल्याची माहिती फरासखाना पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी तेथे कारवाई करून त्यांना ताब्यात घेतले. बेकायदा शस्त्र बाळगणे तसेच विक्री केल्या प्रकरणी त्यांना अटक करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर नावंदे, गुन्हे शाखेचे निरीक्षक नंदकिशोर शेळके, सहायक निरीक्षक अमित घुले, उपनिरीक्षक संगीता गायकवाड आदींनी ही कारवाई केली.

लोकमत – दि. ०९ ऑगस्ट, २०१९

# पाच जणांच्या टोळीला अटक

## पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : आंबेगाव येथील शहीद कर्नल प्रकाश पाटील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगार तौसिफ सय्यद व त्याच्या टोळीतील चौघांना भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे.

तौसिफ ऊर्फ मोसिन जमीर सय्यद (वय २४, रा. संतोषनगर कात्रज), चंद्रशेखर ऊर्फ शेखर बिठोबा ठोंबरे (वय २२, रा. संतोषनगर, मूळ अक्कलकोट, सोलापूर), रवींद्र दत्ता सूर्यवंशी (वय २२, रा. जाधवनगर, वडगाव बुद्रुक), रफिक मदार शेख (वय २१, रा. धबाडी, आंबेगाव), विकास सुभाष सावंत (वय २३, रा.जाधवनगर वडगाव ब्रु) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून ३ लोखंडी कोयते, मिरची पूड, पेट्रोल पंपाचा नकाशा असा १५ हजार रुपयांचा माल जप्त केला. याबाबत पोलिसांनी सांगितले की, तपास पथकाचे उपनिरीक्षक सुबराव लाड हे त्यांच्या पथकासह गस्त घालत असताना कर्मचारी सर्फराज देशमुख व राहुल तांबे यांना माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी आंबेगाव परिसरातील एका शाळेजवळ आडोशाला थांबलेल्या तौसिफ सय्यद व त्याच्या साथीदारांना पकडले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे कोयते व पेट्रोल पंपाचा नकाशा सापडला. त्याबाबत चौकशी केल्यावर प्रकार समोर आला.

- तौसिफ सय्यद हा रेकॉर्डवरील सराईत असून, यापूर्वी त्याच्यावर मार्केट यार्ड येथे पेट्रोल पंपाची ३५ लाखांची रोकड दरोडा टाकून लुटल्याचा, जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. तसेच १५ दिवसांपूर्वी खंडणीच्या स्वरुपात फ्लॅटची मागणी केल्याचा गुन्हा दाखल आहे. तेव्हापासून पोलीस त्याच्या मागावर होते. अनेक गुन्ह्यांत तो न्यायालयात हजर होत नसल्यामुळे न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट काढले होते. तसेच चंद्रशेखर ठोंबरे, रवींद्र सूर्यवंशी व रफिक शेख या तिघांनी मागील आठवड्यात कात्रज चौकात तलवारीने रिक्षाच्या काचा फोडून दहशत निर्माण केली होती. त्यानंतर तेही फरार होते. ठोंबरे व त्याच्या साथीदारांनी शिरवळ येथील एका पत्रकाराला जिवे मारण्याचा प्रयत्नदेखील केला. शेख हादेखील सिंहगड पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.
- ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू पवार, गुन्हे निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुबराव लाड, कर्मचारी कृष्णा बढे, राहुल तांबे, सचिन पवार, कुंदन शिंदे, गणेश चिंचकर यांच्या पथकाने केली.

# पोलिसांनी केले कोकेन जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** बंडगार्डन येथील हॉटेल ब्ल्यू नाइलसमोर संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या नायजेरियन नागरिकाकडून गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने ४ ग्रॅम २१० मिलिग्रॅम कोकेन जप्त केले आहे.

ख्रिस्टीयन ऊर्फ लायनस उवाडीएग्यु अली (वय ४७, रा. मुंबई, मूळ नायजेरिया) असे अटक केलेल्याचे नाव आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन पवार व त्यांचे सहकारी बंडगार्डन परिसरात गस्त घालत असताना त्यांना हॉटेल ब्ल्यू नाइलसमोर अली संशयास्पदरीत्या उभा असलेला दिसला. त्यांनी त्याच्याकडे चौकशी केली. तेव्हा तो काही बोलायला तयार नव्हता. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ४७ हजार ५०० रुपयांचे कोकेन, मोबाईल व रोख ५३० रुपये असा ५० हजार ३० रुपयांचा माल मिळाला. गजानन पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बंडगार्डन पोलिसांनी त्याच्याविरुद्ध एनडीपीएस ॲक्टखाली गुन्हा दाखल करून अटक केली. पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, गजानन पवार, सहायक निरीक्षक जयवंत जाधव व त्यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

**लोकमत** – दि. १३ ऑगस्ट, २०१९

# मारहाण करुन पैसे लुबाडणाऱ्यास अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वच्छतागृहातून बाहेर पडणाऱ्या व्यक्तीच्या मानेला कोयता लावून मारहाण करत खिशातील १ हजार ८०० रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याप्रकरणी स्वारगेट पोलीसांनी एकाला अटक केली.

चाँद फकरुद्दीन शेख (वय २०, रा. बिबवेवाडी) असे अटक केलेल्याचे नाव आहे. या प्रकरणी आणखी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत बळीराम विठ्ठल पवार (वय ३६) यांनी फिर्याद दिली आहे. २५ जानेवारी २०१९ रोजी महर्षीनगर परिसरात ही घटना घडली. पवार हे सार्वजनिक स्वच्छतागृहातून बाहेर पडत असताना दुचाकी वरुन आलेल्या चौघांनी त्यांना अडवले. त्यावेळी आरोपींनी पवार यांच्या मानेवर कोयता ठेवून त्यांच्या खिशातील १ हजार ८०० रुपये जबरदस्तीने काढून घेतले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शेख याला न्यायालयात हजर केले असता, गुन्ह्यातील कोयता व मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी, त्यांचा आणखी कोणी साथीदार आहे का?, त्यांनी अशा प्रकारचे आणखी गुन्हे केले आहेत का? याचा तपास करण्यासाठी त्याला पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकीलांनी केली.

**लोकमत** – दि. २० ऑगस्ट, २०१९

# नांदेड सिटीतील मॉलमध्ये सेक्स रॅकेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मसाज सेंटरच्या नावाखाली सुरु असणारे हायप्रोफाईल सेक्स रॅकेट स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) उघडकीस आणले आहे. या मसाज सेंटरमधून थायलंडच्या पाच युवती व व्यवस्थापक यांना ताब्यात घेतले असून त्यांची तपासणी सुरु आहे.

एलसीबीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पद्‌माकर घनवट यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. नांदेड सिटीतील मॉलमध्ये ऑर्चिड फाईड स्पा नावाचे मसाज सेंटर सुरु असल्याची माहिती एलसीबीला मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे त्यांनी पोलिसांनी तपास करण्यास सुरुवात केली. बनावट ग्राहक पाठवून माहितीची शहानिशा केली. त्या ठिकाणी मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरु असल्याची त्यांची खात्री पटली. यानंतर संबंधित मसाज पार्लरवर छापा टाकला. मसाज पार्लरचा व्यवस्थापक अक्षय रामेश्वर ससेमल (रा. नांदेड सिटी) मसाज पार्लरमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करीत होता. कादर शेख (रा. हडपसर) याच्या सांगण्यावरून तो त्या मसाज सेंटरमध्ये सेक्स रॅकेट चालवत होता. काही महिन्यांपूर्वीदेखील अशाच प्रकारचे सेक्स रॅकेट या भागात उघडकीस आले होते. नांदेड सिटीसारख्या उच्चभ्रू वस्तीमध्ये या प्रकारच्या घटना घडत असल्याने परिसरातील नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

# मौजमजेसाठी त्यांनी चोरल्या ९ दुचाकी

## चार जणांना अटक : भारती विद्यापीठ पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मौजमजेसाठी पुण्यातील विविध ठिकाणांहून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्यांना भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून नऊ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी शंभू राजेंद्र खवळे (वय २०, रा. हडपसर), नीलेश मिटू कदम (वय १९, रा. थेऊर), भानुदास धोत्रे (वय ४०, रा. खंडाळा, जि. सातारा), सुनील जाधव (रा. वेल्हा) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन जण चोरीची स्प्लेंडर जवळ फिरत आहेत. त्यांच्या दुचाकीच्या नंबरप्लेटवर चिखल उडाला आहे. त्यांच्याजवळची दुचाकी ही चोरीची असल्याची माहिती पोलीस कर्मचारी गणेश चिंचकर व अभिजित जाधव यांना बातमीदारामार्फत मिळाली. त्या ठिकाणी जाऊन पोलिसांनी पाहणी केल्यावर दोन जण शेलार मळ्याकडून कात्रज तळ्याकडे येत असल्याचे पोलिसांना दिसले. त्यांना पोलिसांनी शिताफीने पकडले. आरोपींना तुमच्या दुचाकीच्या नंबरप्लेटवर चिखल का लावला, अशी विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन विचारपूस दिली. आरोपींकडून भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून स्प्लेंडर, ड्रीम युगा, पल्सर, यामाहा, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून पॅशन प्रो, लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ॲक्सेस, होंडा शाईन, यवत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून सीबी शाईन अशा चोरलेल्या एकूण ८ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. या दुचाकी त्यांनी मौजमजेसाठी चोरल्या होत्या. त्यांच्याकडून आरोपी भानुदास धोत्रे आणि सुनील जाधव यांच्याबाबतची माहिती मिळाली. त्यांच्याकडून पॅशन प्रो ही दुचाकी जप्त करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक सुबराव लाड

लोकमत – दि. २७ ऑगस्ट, २०१९

# बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकर्पण

## प्रभाग क्र ३७ : सीसीटीव्ही वॉच प्रोजेक्टअंतर्गत ३२ संचांचे उद्‌घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कात्रज:** बिबवेवाडी पोलीस स्टेशन हद्दीत वाहन तोडफोड, महिलां व मुलींचे विनयभंग, चोरी, या व अशा प्रकारच्या घटना अप्पर,बिबवेवाडी परिसरात होवू नयेत याकरिता बिबवेवाडी पोलिसांच्या 'सीसीटीव्ही वॉच प्रोजेक्टच्या' उपक्रमांतर्गत प्रभाग क्रमांक ३७ च्या नगरसेविका रुपाली धाडवे यांच्या वार्डस्तरीय निधीतून 32 सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून, त्यांचा लोकार्पण सोहळाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सीसीटीव्ही कॅमेरा लोकार्पण सोहळाचे प्रमुख पाहुणे पुणे शहर खासदार गिरीश बापट, पूणे महानगर पालिकेचे सभागृहनेता श्रीनाथ भीमाले, माजी नगरसेवक दिनेश धाडवे, बिबवेवाडी प्रभाग क्रमांक ३७ च्या नगरसेविका रुपाली धाडवे, पोलीस सहाय्यक आयुक्त सुनील कलगुटकर वानवडी विभाग, बिबवेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे, सहाय्यक पोलीस निरीक्षक भूषण आडके, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश बाघमारे, बिबवेवाडी पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी व प्रामुख्याने महिला, जनसमुदाय उपस्थित होता.

- बिबवेवाडी पोलिसांनी 'सीसीटीव्ही वॉच प्रोजेक्ट' या उपक्रमांतर्गत बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी ८०० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले असून, ते सर्व एकमेकांशी जीपीएस टॅगने जोडले गेले आहेत.
- त्याचबरोबर प्रत्येक सीसीटीव्ही कॅमेऱ्याची स्थाननिश्चितीही करण्यात आली आहे. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे एखाद्या ठिकाणी गुन्हा घडल्यानंतर पोलीस लगेचच त्या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण पाहू शकतात. या कॅमेऱ्यांमुळे मोबाईल चोरी, विनयभंग, गंभीर स्वरुपातील गुन्हे रोखणे पोलिसांना शक्य होणार आहे. असे बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुरलीधर करपे यांनी सांगितले.



उद्घाटनप्रसंगी गिरीश बापट आणि मान्यवर.

# आडोशाला थांबलेल्यांची झाडाझडती

## चोऱ्या रोखण्यासाठी पोलिस आयुक्तांचे आदेश

"पावसाळ्यात चोरट्यांकडून रात्रीच्या वेळी बंद घरे आणि दुकानांतील ऐवज चोरण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे गृहसंकुले आणि व्यापारी पेठांमधील सुरक्षारक्षकांनी पावसापासून बचाव करण्यासाठी आडोसा घेण्याच्या नावाखाली अनोळखी व्यक्ती परिसरात घुटमळत नाही ना, याची खात्री करावी. व्यक्ती संशयास्पद आढळल्यास तत्काळ नियंत्रणकक्षाशी १०० क्रमांकावर संपर्क साधावा. गुन्हे शाखेसह स्थानिक पोलिस ठाण्यांचे अधिकारी-कर्मचारी यांना गस्तीबाबत विशेष दक्षता घेण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत.

– अशोक मोराळे, अतिरिक्त आयुक्त, गुन्हेशाखा

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शहरातील चोऱ्यांचे प्रमाण नियंत्रणात येण्याचे नाव घेत नसतानाच आता चोरट्यांनी पावसाच्या आडून चोऱ्या करण्याचे 'उद्योग' सुरू केल्याने पोलिसांच्या डोकेदुखीत वाढ झाली आहे. या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी मध्यरात्री पाऊस पडत असताना गस्तीच्या वेळी इमारत, झाड आणि दुकानांच्या आडोशाला थांबलेल्यांची कोणताही आडपडदा न ठेवता चौकशी करण्याचे आदेश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत.

मुसळधार पाऊस पडत असताना मध्यरात्री पुणे शहरात घरफोड्या होत असल्याचे प्रकार उघडकीला आले आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये अशा प्रकारच्या चोऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे रात्रीच्या घरफोड्या रोखण्यासाठी पोलिस आयुक्तांनी 'अकरा कलमी' कार्यक्रमच आखून देण्यात आला आहे.



शहरात यापूर्वी घडून गेलेल्या चोरीच्या घटनांची वेळ आणि ठिकाणे निश्चित करून तेथे अधिकाधिक कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात यावी, शक्यतो दुचाकी आणि पायी गस्त घालून या घटनांना आळा घालण्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

त्याचबरोबर मधरात्री अधिक सतर्क राहण्यासाठी गृहसंकुले आणि व्यापारी पेठांमधील सुरक्षारक्षकांची बैठक घेण्याचे, स्थानिक मंडळांचे कार्यकर्ते आणि पोलिस मित्रांची मदत घेण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत. पोस्ट ऑफिस, पतपेढ्या, बँका, व्यापारी पेठा, गृहसंकुलांना खासकरून रात्री-अपरात्री टार्गेट केले जात आहे. त्यामुळे संबंधित परिसरातील नागरिकांच्या बैठका घेऊन त्यांना दक्ष राहण्यासाठीच्या सूचना देण्यासही सांगण्यात आले आहे. या शिवाय झोपडपट्ट्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन राबवावे, पाऊस असतानाही रात्री-अपरात्री फिरणाऱ्यांना थांबवून त्यांची वाहने तपासण्याचे आदेश गस्तीवरील पोलिसांना देण्यात आले आहेत.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांकडून छापा

## सव्वा दोन लाखांचा मुद्देमाल जप्त; १४ जण ताब्यात

म. टा. वृत्तसेवा, दौंड



शहरातील वातानुकूलित जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून २ लाख १२ हजार ७२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, १४ जणांना ताब्यात घेतले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. बारामतीचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयंत मीना यांच्या उपस्थितीत ही कारवाई झाली.

शहरातील इंदिरानगरमध्ये एका बंद खोलीत इक्बाल शेख जुगाराचा अड्डा चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार अतिरिक्त पोलिस अधीक्षक जयंत मीना यांच्या पथकाने बारामती गुन्हे शोध पथकासह छापा टाकला. या छाप्यात रोख रक्कम १ लाख १६ हजार ७३० रुपये, ७० हजार रुपये किमतीचे १० मोबाइल , एसी, इन्व्हर्टर असा एकूण २ लाख १२ हजार ७२१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, १४ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. रात्री उशिरा त्यांच्यावर गुन्हा दाखल करून, नंतर जामिनावर सोडण्यात आले.

गुन्हे शोध पथकाचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, दौंड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील महाडिक, यवत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक धनंजय कापरे, सहायक फौजदार भाकरे, पोलिस नाईक स्वप्नील अहिवळे, हवालदार संदीप जाधव, सुरेंद्र वाघ, शिपाई दशरथ कोळेकर, विशाल जावळे, कॉन्स्टेबल सचिन बोराडे, महिला शिपाई रूपाली पवार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# सराईतांना 'दामिनी'कडून अटक

## हातात शस्त्र घेऊन करत होते आरडाओरडा

म. टा. प्रतिनिधी, हडपसर

ससाणेनगर रेल्वेफाटक ते काळेपडळ या रस्त्यावर हातात कोयता घेऊन आरडा-ओरडा करून दहशत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन सराईतांना पोलिसांच्या 'दामिनी' पथकाने (गुन्हे प्रतिबंधक पथक) पाठलाग

**क्राइम डायरी**

करून अटक केली आहे. त्यांच्यावर बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दामिनी मार्शल रूपाली टेंगले यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, विराज यादव (वय २४, रा. सुयश-सृष्टी अपार्टमेंट, हांडेवाडी रोड), अमोल बोरकर (वय २४, रा. काळेपडळ, हडपसर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी चार वाजण्याच्या सुमारास ससाणेनगर रेल्वे फाटकाच्या अलीकडे असलेल्या 'मोअर मॉल'च्या शेजारील रस्त्यावर आरोपी यादव हातात कोयता आणि व अमोल गावठी पिस्तूल घेऊन फिरत होते. रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांवर शस्त्र उगारून ते आरडा-ओरडा करत होते. हा प्रकार 'दामिनी पथका'तील रूपाली टेंगले, सोनाली कारंडे, धनश्री गवस व रूपाली शिंदे यांच्या निदर्शनास आला. त्या आरोपींना पकडण्यासाठी त्यांच्यामागे धावू लागताच आरोपींनी तिथून पळ काढला. परंतु, महिला पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडले.

पोलिसांनी आरोपींकडून लोखंडी कोयता आणि पिस्तूल ताब्यात घेतले असून, या प्रकरणी तपास सुरू आहे.

### जुगार खेळणाऱ्या पाच जणांना अटक



येरवडा : धानोरी परिसरातील एका सोसायटीच्या सदनिकेत चोरून चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून विश्रांतवाडी पोलिसांनी पाच जणांना अटक केली आहे. जीवन मोहन जाधवर (वय ३४, रा. गोकुळनगर, धानोरी), प्रशांत चव्हाण (४४, रा. सर्व्हे नं. ११२, रा. विश्रांतवाडी, विशाल आगरवाल (३६, रा. कैलाश भवन, विश्रांतवाडी), इम्रान पठाण (३२, रा. दत्त मंदिराजवळ, कळस) आणि सचिन खुडे (३२, रा. शास्त्रीनगर, येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिस कर्मचारी सोमनाथ खळसोडे यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. धानोरी रस्त्यावर आईजी निवास सोसायटीत तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेत जुगार अड्डा चालविला जात असल्याची माहिती पोलिस निरीक्षक (गुन्हे) रवींद्र कदम यांना मिळाली होती. त्यानुसार कदम यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने सापळा रचला.

**महाराष्ट्र टाइम्स – दि. ३० ऑगस्ट, २०१९**

# बेकायदा परदेशी नागरिक अटकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बेकायदा पुण्यात राहणाऱ्या दोघांना परदेशी नागरिकांना विशेष शाखेच्या परकीय नागरिक नोंदणी शाखेने अटक केली आहे. यामध्ये एका केनियन महिलेला आणि एका नायजेरियन नागरिकाचा समावेश आहे. सोमवारी (२६ ऑगस्ट) कोंढवा येथील वडाची वाडी येथे ही कारवाई करण्यात आली.

स्टेनली ओविरा इवेमेरी असे नायजेरियन नागरिकाचे नाव आहे. तर इथर काली मबीथी मवंगंगी असे अटक करण्यात आलेल्या केनियन महिलेचे नाव आहे. उपायुक्त मितेश गट्टे यांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी ब्लॅक लिस्ट करण्यात आलेला परकीय नागरिक बेकायदा पुन्हा पुण्यात येऊन वास्तव्य करीत असल्याची माहिती परकीय नागरिक नोंदणी शाखेचे पोलिस कर्मचारी केदार जाधव यांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी वडाची वाडी येथे सापळा रचून स्टेनली याला अटक केली. त्या वेळी त्याच्या घरामध्ये एक केनियन महिला बेकायदा वास्तव्य करीत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यांना स्थानबद्ध केले असून, त्यांच्याकडे सखोल चौकशी करण्यात येत आहे.

सहायक आयुक्त चंद्रकांत सांगळे, वरिष्ठ निरीक्षक वसंत कुवर, कर्मचारी केदार जाधव, पॉल अँथनी, दिलीप काची, आनंद शिंदे, गोविंद भगत, निलीमा खिलारे, संदीप कांबळे, सौरभ महाशब्दे, उमेश शिंदे, सचिन सहाणे, रेहना शेख, करुणा सरकाटे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

**पुढारी – दि. ०६ ऑगस्ट, २०१९**

# गावरान तूप विकण्याच्या बहाण्याने ज्येष्ठांना गंडविणाऱ्या टोळीला अटक

पुणे : प्रतिनिधी

म्हशीच्या दुधाचा चिक व गावरान तूप विक्री करण्याच्या बहाण्याने शहरात ज्येष्ठ नागरिकांना गंडविणाऱ्या बारामती तालुक्यातील टोळीला गुन्हे शाखेच्या युनिट एकच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून सात गुन्ह्यांची उकल करत दागिने, तीन दुचाकी, मोबाईल असा एकूण १० लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

अशोक ऊर्फ कांट्या विश्वनाथ गंगावणे (वय २७), सुनील सोमनाथ बाईकर (वय ३०, रा. विठ्ठलवाडी, ता. बारामती), नवनाथ विष्णू बाईकर (वय २२), लंकेश पोपट बाईकर (वय २२, दोघे रा. बांदलवाडी, ता. बारामती) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

गेल्या काही दिवसांत शहरात दूध; तसेच तूप विक्रीच्या बहाण्याने काहीजण घरात शिरत; तसेच या घरातल्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचा विश्वास संपादन करत. आमच्या घरी लग्न आहे. त्यासाठी सोन्याचे दागिने बनवायचे आहेत. तुमच्याजवळील दागिने दाखवा. असेच हुबेहूब दागिने तयार करून घ्यायचे आहेत, अशीही बतावणी करत. त्यानंतर आई किंवा वडील खाली थांबले आहेत. त्यांना दाखवतो म्हणून आरोपी दागिने घेऊन पसार होत होते. याप्रकरणी विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले होते. समांतर तपास गुन्हे शाखाही करत होती. परिसरातील सीसीटीव्हीची पडताळणी करण्यात आली होती. त्यानुसार, आरोपींची माहिती काढली जात असताना युनिट एकच्या पथकातील योगेश जगताप, मल्लीकार्जून स्वामी व सुधाकर माने यांना माहिती मिळाली की, फसवणूक करणारे तिघे बांदलवाडी येथे आहेत. त्यानुसार, अप्पर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक दिनेश पाटील, हनुमंत शिंदे, कर्मचारी तुषार खडके, इरफान मोमीन, अमोल पवार, अजय थोरात व त्यांच्या पथकाने सापळा रचला आणि बांदलवाडी येथे तिघांना पकडले. सुनील बाईकर याच्या मदतीने गुन्हे केल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर सुनील यालाही पकडण्यात आले. आरोपींकडून ६ लाख ५४ हजार रुपयांचे दागिने, तीन दुचाकी, मोबाईल असा एकूण १० लाख ७० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. आरोपी अशोक याच्यावर यापूर्वी सोने चोरीचे दोन गुन्हे दाखल आहेत.

### दूध व्यवसाय ते फसवणूक



आरोपींचा दूध व तूप विक्रीचा व्यवसाय आहे; तसेच सर्वजण एकमेकांचे नातेवाईक आहेत. बारामतीवरून ते सकाळच्या वेळी पुण्यात येत असत. ज्येष्ठ नागरिकांची घरे हेरून त्यांच्याशी तूप विक्रीविषयी बोलणी करत आमच्याही घरी लग्नकार्य असल्याचे सांगत; तसेच त्यांच्याकडून दागिने घेऊन पसार होत असत. अशा प्रकारे कोणाची फसवणूक झाली असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त बच्चन सिंह यांनी केले आहे.


म्हशीचा चीक देण्याच्या आमिषाने लूटमार!
मागील काही दिवसांत शहर परिसरात चोरीच्या अनेक घटना

MEETING AT POLICE COMMISSIONERATE

# Will act against illegal private security firms, warns police chief

## K Venkatesham urges private security firms to cooperate with police to prevent crime, inform about suspicious acts

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, AUGUST 9

THE PUNE City Police is planning to take action against private security agencies that are operating illegally without obtaining licences from the government. While warning private security agencies, Pune City Police Commissioner K Venkatesham said Friday they should cooperate with the police to prevent crimes.

Venkatesham was speaking at the 'Police Private Security Partnership Programme (P4)', held Friday at the Pune Police Commissionerate. The owners and managers of as many as 211 private security agencies participated in the programme, along with senior police officers, stated a press release issued by the police.



K Venkatesham

Venkatesham asked private security agencies to inform the police about any suspicious movement in residential areas and other spots where private guards are deployed. He also said that private security guards who play a role in detection of crimes will be felicitated.

Venkatesham also said that the process of character verification of private security guards will now be completed within five days. He said police will seek help from private security agencies, if required, during Ganesh festival.

In a related development, the police have urged private security agencies to be cautious while employing a security guard. Private security agencies have also been told to update information of their guards regularly and share it with the nearest police station.

Police said that private security guards deployed at different locations should maintain contact with the "beat marshals" of the respective police station who are patrolling the area.

**प्रभात** – दि. १२ ऑगस्ट, २०१९

# पोलिसांनी 'व्हॉटस् ॲप'द्वारे जोडले २१ हजार सुरक्षारक्षक

**पुणे, दि. ११** - पुणे पोलीस व खासगी सुरक्षा रक्षक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस प्रायव्हेट सिक्युरिटी पार्टनरशीप प्रोग्रॅम पी-४ हा कार्यक्रम पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये साजरा करण्यात आला. पोलीस स्टेशन आणि सुरक्षा रक्षक यांचे १२० व्हॉटस् ॲप ग्रुप तयार करून संपूर्ण शहरात २१ हजारांहून अधिक खासगी रक्षक जोडले आहेत.

पोलीस आयुक्त डॉ. के. वेंकटेशम (भापोसे), पोलीस सह आयुक्त रवींद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त गुन्हे बच्चन सिंग, अपर पोलीस आयुक्त (प्रशासन) डॉ. संजय शिंदे, तसेच भारत शिल्ड फोर्सचे संस्थापक सचिन मोरे व महाराष्ट्र राज्यातील सुरक्षा रक्षक सेवा पुरवठादार संस्थेचे मालक आणि चालक कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी केले. माय गेट आणि भारत शिल्ड फोर्सच्या वतीने सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**पुढारी** – दि. ०१ ऑगस्ट, २०१९

### अमेरिकन मावशीच्या नावाने घालत होती गंडा

# 'डॉलर' फेम टोळी गजाआड

- परप्रांतातील तिघा पुरुषांसह महिलेचा समावेश
- डॉलरच्या बहाण्याने कागदी बंडल करायचे हवाली

**पुणे : प्रतिनिधी**

अमेरिकन मावशीच्या नावाने कमी पैशात डॉलर देण्याच्या बहाण्याने शहरातील नागरिकांना गंडा घालणाऱ्या डॉलर फेम टोळीला खडक पोलिसांनी जेरबंद केले. ही टोळी आंतरराज्य टोळी असून, यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड येथील एक महिला व तीन पुरुषांचा समावेश आहे. मागील पाच महिन्यांपासून या टोळीचे वास्तव्य येरवडा परिसरात होते. या अगोदरदेखील त्यांच्यावर सहकारनगर व येरवडा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.


अमेरिकन मावशीच्या नावाने होतेय फसवणूक

कबीर सलीम शेख (२९, रा. येरवडा, मूळ झारखंड), मुस्तफा शहावली शेख (३१, रा. येरवडा, मूळ उत्तर प्रदेश), सलमान आलम शेख (२६, रा. उत्तर प्रदेश), नसीमा बेगम मोहम्मद मुकीन (४८, रा. बिहार) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या वेळी त्यांच्या बँक खात्यातील २ लाख १९ हजार रुपये सील करण्यात आले असून, ४३ हजार ८४० रुपयांचे साहित्यही हस्तगत करण्यात आले आहे.

कोथरूड परिसरात राहणारे किशोर गरुड (२८, रा. कोथरूड) यांना अमेरिकन डॉलर देण्याच्या आमिषाने २२ ऑगस्ट रोजी या टोळीने फसवले होते. दाखल गुन्ह्याचा तपास करत असताना तांत्रिक विश्लेषणानंतर आरोपी आणखी एकाला फसवण्यासाठी पान २ वर

# ‘माथाडी’च्या नावाखाली व्यावसायिकाकडे खंडणी

## गजानन मारणे टोळीतील सराईतासह चौघे जेरबंद

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२ -** हॉटेल व्यावसायिकाला जीवे मारण्याची धमकी देत खंडणी मागण्यात आली. या प्रकरणी गजानन मारणे याच्या टोळीतील सराईतासह चौघांना गुन्हे शाखा युनिट तीनच्या पथकाने जेरबंद केले. सव्वादोन महिणे हे आरोपी हॉटेल व्यावसायिकाला धमकावत होते. मागील वर्षभरात माथाडी संघटनेच्या नावाने खंडणी मागण्याचे प्रकार वाढले आहेत. या प्रकरणाची पोलीस आयुक्तांनी गांभीर्याने दखल घेतल्यावर गुन्हे दाखल करून अनेकांना जेरबंद केले आहे.

ओम तिर्थराम धर्मजिज्ञासु (३०, रा. कोथरुड), ललीत मारुती काकडे (२८, रा. राजयोग सोसायटी, वारजे माळवाडी), महेश कालिदास परीट (१९, रा. जयभवानीनगर, कोथरूड), योगेश प्रकाश कानगुडे (२४, रा. सुतारदर, कोथरुड) अशी अटक आरोपींची नावे



आहेत. याप्रकरणी कुमार राजेंद्र झेंडे (२७, रा. भेकराईनगर) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी यांचे करिश्मा सोसायटीमध्ये ९५ पास्ता अॅन्ड पिझ्झा आणि ब्रु रुम कॅफे नावाचे स्नॅक सेंटर आहे. जून महिन्यामध्ये त्यांच्या ९५ पास्ता अॅन्ड पिझ्झा दुकानाच्या फर्निचरचे काम सुरु होते. तेव्हा योगेश कानगुडेने तेथे येऊन माथाडी संघटनेचा सदस्य असल्याचे सांगत स्वत:चे व्हिजिटींग कार्ड आणि ओम धर्मजिज्ञासु व स्वत:च्या नावाचे लेटर हेड दिले. तसेच ‘तुम्ही तुमच्या दुकानात जो माल उतरवता, त्यासाठी आमचे हमाल वापरत नाही. त्या बदल्यात तुम्हाला आम्हाला पैसे द्यावे लागतील’ असे सांगितले. तेव्हा फिर्यादीने त्यांना ‘माझ्या कामाची तसेच लग्नाची गडबड सुरू असल्याने पैसे देऊ शकत नाही, आपण नंतर बघू’ असे सांगितले होते. मात्र, त्यानंतरही आरोपी वारंवार फोन करून तसेच प्रत्यक्षात भेटून त्यांना ‘पैसे द्या नाहीतर बघून घेऊ’ असे धमकावत होते. दरम्यान, फिर्यादीची दोन्ही हॉटेल सुरू झाल्यावर आरोपींनी तेथे दाखल होत. ‘आम्हाला दर महिना १८ हजारचा हप्ता द्यावा लागेल, आम्ही महाराजांची माणसे आहोत, तुला खल्लास करू आणि हॉटेल चालू देणार नाही’, अशी धमकी दिली. फिर्यादीने अखेर या धमकी व त्रासाला कंटाळून तक्रार दाखल केली.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट तीनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी, पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे, संजय गायकवाड, राजकुमार केंद्रे व पोलीस कर्मचारी अनिल शिंदे, रामदास गोणते, संदीप तळेकर, दत्तात्रय गरुड, संदिप राठोड, प्रविण तापकीर, संतोष क्षिरसागर, गजानन गानबोटे, सचिन गायकवाड यांच्या पथकाने केली. दरम्यान, आरोपी ओम धर्मजिज्ञासू याच्याविरुद्ध कोथरूड पोलीस ठाण्यात सन २००९ मध्ये खुनाचा, सन २०१५ मध्ये दुखापतीचा, भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात सन २०१७ मध्ये पिस्तोलजवळ बाळगल्याचा असे ३ गुन्हे दाखल आहेत. ओम हा माथाडी कामगार संघटनेचा पुणे जिल्हा अध्यक्ष व ललीत काकडे हा उपाध्यक्ष म्हणून काम करत असल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले आहे.

### ‘नागरिकांनो, खंडणी मागणाऱ्यांची माहिती द्या’

शहरात वेगवेगळ्या ठिकाणी व्यापारी, हॉटेल व मॉलचे मालक व चालक यांना माथाडी कामगार संघटनेच्या नावाखाली खंडणी मागीतल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्या दृष्टीने पोलीस तपास करत आहेत. आरोपींनी या प्रकारे कोणाला खंडणी मागितली असल्यास गुन्हे शाखा युनिट तीनच्या ९४२००१५७१८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. आरोपी ओम धर्मजिज्ञासू व योगेश कानगुडे, ललीत काकडे व महेश परीट वेगवेगळ्या वेळी फिर्यादीला खंडणी मागण्यासाठी येत होते. ओम हा तथाकथित माथाडी संघटनेचा अध्यक्ष तर ललीत काकडे हा उपाध्यक्ष आहे. दोघांनाही फिर्यादीकडे खंडणी मागताना एकमेकांना माहिती दिली नव्हती. फिर्यादीला योगेशने स्वत:चे व ओमचे नाव असलेले लेटरहेड तर महेशने स्वत:चे व ललितचे नाव असलेले लेटरहेड दिले होते. फिर्यादीने ही बाब ओमच्या निदर्शनास आणून दिल्याने त्यांनी आपापसात चर्चा करून १८ हजार रुपये प्रति महिना खंडणी देण्याची मागणी केली.

प्रभात – दि. २३ ऑगस्ट, २०१९

# कोकेन विक्रीसाठी आलेला नायजेरीयन जाळ्यात

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** कोकेनची विक्री करण्यासाठी आलेल्या नायजेरीयन नागरिकास खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाने जेरबंद केले. त्याच्या ताब्यातून ४७ हजार ५०० रुपयांचे कोकेन (४ ग्रॅम २१० मिलीग्रॅम) हस्तगत करण्यात आले. ख्रिस्टीयन ऊर्फ लायनस



उवाडीएम्यु अली (४७, रा. मिरा रोड, मुंबई, मुळ नायजेरीया) असे अटक आरोपीचे नाव आहे. पोलीस निरीक्षक गजानन पवार गस्त घालित असताना त्यांना ब्लू नाईन हॉटेलसमोर एक नायजेरीयन संशयास्पदरित्या उभा असलेला दिसला. त्याची झडती घेतली असता प्लॅस्टिकच्या पिशवीत कोकेन, एक मोबाइल व रोख ५३० रुपये आढळले. त्याला अटक करून बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते करत आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, गजानन पवार, सहायक पोलीस निरीक्षक जयवंत जाधव, पोलीस कर्मचारी आनंद रावडे, संतोष मते, विजय गुरव, सुनील चिखले, प्रविण पडवळ, दिनेश गुडांकुश, विनायक जाधव, संतोष देशपांडे, विठ्ठल बंडगर, मंगेश पवार यांच्या पथकाने केली.

महाराष्ट्र टाइम्स – दि. १९ ऑगस्ट, २०१९

# 'ओएलएक्स'वरून फसवणूक रोखण्यासाठी सायबर सेलची कारवाई

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'ओएलएक्स'वरून नागरिकांची फसवणूक करण्याच्या घटना वाढत असल्यामुळे पुणे सायबर सेलने या वेबसाइटवरील ९०० सिमकार्ड क्रमांक, गुन्ह्याशी संबंधित ६०० बँक खाती आणि एक हजार 'आयएमईआय' क्रमांक असलेले मोबाइल ब्लॉक केले आहेत. त्यामुळे 'ओएलएक्स'वरून फसवणूक झाल्याचे तक्रार अर्ज घटल्याचा दावा सायबर पोलिसांनी केला आहे.

''ओएलएक्स'वरून फसवणूक झालेल्या नागरिकांची संख्या पुणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत २०१८मध्ये २२५ इतकी होती. या वर्षी जुलैअखेरपर्यंत ७०० नागरिकांची फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या घटना वाढत असल्यामुळे पुणे सायबर पोलिसांनी गुन्ह्यांचा अभ्यास केला. यामध्ये वेबसाइटवर जाहिरातीच्या ठिकाणी टाकलेले मोबाइल क्रमांक पडताळण्यात आले. त्या वेळी ते बोगस व्यक्तीच्या नावावर घेतल्याचे आढळून आले. या प्रकारचे ९०० मोबाइल क्रमांक ब्लॉक करण्यात आले.



> ओएलएक्स'वरून फसवणुकीचे प्रकार वाढल्याने सायबर सेल पोलिसांनी अभ्यास करून मोबाइल क्रमांक, आयएमईआय क्रमांक, बँक खाती ब्लॉक केली आहेत. या प्रकारे फसवणूक करणारे बहुतांश आरोपी हे राजस्थानमधील भरतपूर, अलवर जिल्ह्यातील असल्याचे आढळून आले आहे.
>
> – संभाजी कदम, पोलिस उपायुक्त, सायबर सेल

**'ओएलएक्स'वरून फसवणूक**

| | |
|---|---|
| ७०१ | २२५ |
| २०१९ जुलैअखेर तक्रार अर्ज. | २०१८ या वर्षातील तक्रार अर्ज. |

**सिमकार्ड, बँक खाती दुसऱ्याच्या नावावर**

'ओएलएक्स'वर जुन्या वस्तूच्या विक्रीची जाहिरात टाकली जाते. त्यामध्ये आरोपी मोबाइल क्रमांक देतात. पण, हा क्रमांक दुसऱ्याच व्यक्तीच्या नावावर असतो. गुन्हा केल्यानंतर तो क्रमांक बंद केला जातो. वस्तू खरेदीसाठी नागरिकाला एका खात्यावर पैसे पाठविण्यास सांगितले जाते. ते खातेदेखील एखाद्या गरीब व्यक्तीचे असते. त्याला थोडीफार रक्कम देऊन त्याचे खाते वापरण्यास घेतले जाते. अशा पद्धतीने आरोपी दुसऱ्याच्या नावावरील सिमकार्ड व बँक खात्याचा वापर करत असल्याचे समोर आले आहे.

तसेच, गुन्ह्यांची माहिती घेऊन त्यासाठी वापरलेली ६०० बँक खातीदेखील ब्लॉक करण्यास बँकांना सांगण्यात आले. 'ओएलएक्स'वरून फसवणुकीसंदर्भात एक हजार 'आयएमईआय' क्रमांकही ब्लॉक करण्यात आले. त्यामुळे 'ओएलएक्स'वरून फसवणूक झाल्याबद्दल येणाऱ्या तक्रार अर्जांची संख्या निम्म्यापेक्षा कमी झाली आहे. अशी माहिती सायबर गुन्हे शाखेचे उपायुक्त संभाजी कदम यांनी दिली.

नागरिकांना परवडणाऱ्या हव्या त्या वस्तू मिळू लागल्यामुळे ऑनलाइन खरेदीचे प्रमाण वाढत आहे. काही वेबसाइट जुन्या वस्तूंची खरेदी-विक्री करतात. गेल्या काही वर्षांपासून जुन्या वस्तू खरेदी-विक्रीसाठी असलेल्या 'ओएलएक्स' ॲपवरून फसवणुकीचे प्रकार वाढत होते. या वर्षी 'ओएलएक्स'वरून फसवणुकीच्या घटनांनी उच्चांक गाठला होता. विविध वस्तू स्वस्तामध्ये विकण्याच्या आमिषाने नागरिकांकडून पैसे घेऊन फसविले जात होते. या घटना वाढत असल्याने सायबर सेलने 'ओएलएक्स'च्या अधिकाऱ्यांना बोलवून नागरिकांची फसवणूक होणार नाही, याबाबत उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, हे प्रकार घडतच होते. अलीकडे तर लष्करी जवानांच्या नावाने फसवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत होते. लष्करी जवानाचा फोटो पाहिल्यानंतर नागरिकांचा तत्काळ आरोपींवर विश्वास बसत होता. त्यामुळे नागरिक वस्तू खरेदीसाठी पैसे पाठवून देत होते.

# अभिप्राय...

मा. वरिष्ठ पो. निरीक्षक सो.
कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे.
यांना सविनय सादर

रिपोर्ट - श्री. एम. पाडवी पोलीस उपनिरीक्षक, कोंढवा पोस्टे यांजकडून.

विषय - दर्पण पुस्तकाबाबत.

दर्पण हा उपक्रम सुरु झाल्यापासून पोलीसांनी केलेल्या कामगिरीबद्दल लोकांना माहिती मिळते. या उपक्रमामुळे पोलीस व जनता यांच्यातील संबंध अधिक सुसंवादाचे होत आहे. जनतेचा व सामान्य लोकांचा पोलीसांवरचा विश्वास अधिक बळकट होत आहे. मा. पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांनी सुरु केलेला दर्पण हा उपक्रम प्रशंसनीय असून तो पोलीसांसाठी व जनतेसाठी उपयुक्त असून मोलाचे मार्गदर्शक असा ठरला आहे.

मा. सादर व्हावे.
ता. 18/05/19.
[signature]
पोलीस उपनिरीक्षक
कोंढवा पो.स्टे. पुणे शहर

---

**सहकारनगर पोलीस ठाणे**

**दर्पण पुस्तिका अभिप्राय**

१) पोलीस कर्मचारी याचे पुर्ण नाव :- मिनाक्षी जितेंद्र महाडिक

२) पदनाम :- महिला पोलीस नाईक

३) बक्कल नंबर :- ५९९१

४) नेमणुकीचे ठिकाण :- सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर

५) दर्पण पुस्तिकेबाबत आपला प्रतिक्रियात्मक अभिप्राय / मत :-
माननिय महोदय,
दर्पण पुस्तिकेचे वाचन केले. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांची कल्पना पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी, नागरिक यांना उत्कृष्ठ कामगिरी करण्यास प्रोत्साहन देणारी आहे. पोलीस आयुक्तालयांतर्गत येणाऱ्या पो. स्टेशन दाखल गुन्हे, त्यांची उघडकीस माहिती, तपासाबाबतची माहिती, पोलीसांकडून करण्यात येणाऱ्या चांगल्या कामगिरी दर्पण या पुस्तिके मार्फत वाचण्यास मिळाली. दर्पण पुस्तिके मार्फत संबंधित माहिती पुढे येणाऱ्या पोलीस बांधवांना प्रेरणा देणारी असेल. या पुस्तिकेचा संग्रह होणे आवश्यक आहे असे आवर्जून वाटत आहे. तसेच मा. पोलीस आयुक्त सरांची सदरची संकल्पना दैनंदिन कामकाजाकरिताही उपयोगी ठरेल. धन्यवाद सर.

दिनांक :- २९.०५.२०१९

Mahadik
LPN 5991.
स्वाक्षरी


Man arrested for estranged girlfriend's murder attempt
Will act against illeg private security firm warns police chief
बिबवेवाडीमध्ये सीसीटीव्हीचे लोकार्पण
बिबवेवाडी पोलिसांनी पाठलाग करून जप्त केली ३५० लिटर दारु
चालक व मालकांवर कारवाई करणार
अश्लील चाळे करणाऱ्या महिलांवर कारवाई
गुन्हा दाखल : आठवड्यात ८ महिलांना
शाखेकडून गुंडांची झाडाझडती
पाच जणांच्या टोळीला अटक
पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या होते तयारीत
वाहनांची तोडफोड करणारे गजाआड, पाच तासांत अटक
मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय
धक्का लागला म्हणून कोयत्याने वार; तिघे जेरबंद
चार किलो गांजासह आरोपीला अटक
कर्ज फेडण्यासाठी झाला 'तो' साखळीचोर
पुरुषांपेक्षा पोलिसांवर महिलांचा विश्वास
महिला सुरक्षेसाठी 'दामिनी टू' पथक
पोलिसांना मदत करणाऱ्या संस्थांचा सन्मान
कमी किमतीत बुलेट देण्याचे आमिष
गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या तिघांना अटक
पोलीस बांधवांप्रति आदराची भावना बाळगा : अमृत पठारे
नात्यांमध्ये सुसंवाद ठेवणे आव्हानात्मक
चोरीला गेलेला मुद्देमाल पुन्हा मिळताच चेहऱ्यावर फुलले ह
पोलिस ठाण्यांत आता 'सीपीओ'
पोलिस आणि नागरिकांमधील दुवा म्हणून करणार काम; आयुक्तांचा उपक्रम
Cops bust gang for duping finance cos of ₹4.5 crore
सुखकर्ता पुरस्काराचे वितरण उत्साहात
उत्सवात बेशिस्तीचे 'थर' नकोच
एका ढोल ताशा पथकाला एकाच मंडळात सहभागी होता येणार
नागरिकांच्या वॉर्डस्तरीय निधीतून संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणार
हरविलेली बालके अखेर विसावली आईच्या कुशीत
Gang duping people with promise of real American dollars nabbed
अशिक्षितांचा पोलिसांवर विश्वास
सोशल मीडियामु
सापडला हरवलेला
संक्षिप्त
औषधाच्या पावतीवरून घेतला शोध
दामिनींनी केले पाकीट परत
एका ढोल ताशा पथकाला
मंडळात सहभागी होता येणा
पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे : विसर्जन
सराईत चोरट्याकडून २४ मोबाइल हस्तगत
गुन्हेगारी रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक
फिक्की फ्लो संस्थेच्या चर्चासत्रात मार्गदर्शन
भरपावसात बालकाला मंदिरात सोडून पित्याचा पळ
विद्यार्थ्यांनी वाहतुकीच्या नियमांची जागृती करावी
राजेश पुराणिक : रामचंद्र महाविद्यालयामध्ये रस्ता सुरक्षा सप्ताह कार्यक्रम
डपसर पोलीस स्टेशनमध्ये रक्षाबंधन
हेल्मेटमुळे वाचले वाहतूक पोलिसां
आईनेच केला चिमुकल्याच्या अपहरणाचा बनाव
गरिबीमुळे सांभाळ अशक्य, म्हणून दिले होते ओळखीच्या दाम्पत्याकडे
इंजिनिअर 'लखोबा लोखंडे' अखेर जेरबंद